(परिशिष्ठ - अ)

दिनांक ११/७/२०२४

प्रति,

**मा. सहा. धर्मादाय आयुक्त / संस्था निबंधक,**

**सातारा विभाग, सातारा**

विषय :- संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये, संस्था नोंदणीबाबत

**'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**

**कराड- मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४,ता.कराड,जि.सातारा**

महोदय,

निवेदन करण्यात येते की, वर विषयात नमुद केलेल्या संस्थेची नोंदणी अधिनियम १८६० प्रमाणे करावयाची आहे. सबब आपणाकडे खालीलप्रमाणे कागद सादर करण्यात येत आहेत.

१) विधानपत्र, (ज्ञापन) (मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन).

२) नियम व नियमावलीची सत्य प्रत. (आर्टीकल्स् ऑफ असोसिएशन)

३) संस्था नोंदणी संदर्भात कार्यकारी मंडळाचे सर्व सभासदांचे संमतीपत्र.

४) संस्था नोंदणी बाबत कार्यकारी मंडळा सर्व सभासदांच्या सहिनिशी अधिकारपत्र.

४) संस्थेच्या कार्यालयाचे पत्त्याबाबत व मालमत्तेबाबत अध्यक्ष वा सचिव यांचे घोषणापत्र.

६) अनुसूची एक (नियम ७)

७) अनुसूची दोन (नियम ८)

८) अनुसूची सहा (नियम १५)

९) संमतीपत्र (१९५०)

१०) संस्थेच्या स्थापनेबाबतच्या ठरावाची सत्यप्रत

११) हमीपत्र

१२) प्रथम कार्यकारिणीची यादी

१३) संस्थेच्या पत्त्याबाबत जागा मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र

१४) सर्व सभासदांचे ओळखपत्र व पत्त्याचा पुरावा.

पुढे असेही निवेदन करण्यात येते की, वरील संस्थेचे उद्देश हे सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमाच्या कलम २० अन्वये असून वरील संस्थेच्या नावाची व नामसदृश असलेली संस्था माझे माहितीप्रमाणे आस्तित्वात नाही. नोंदणी शुल्क रुपये ५०/- (रुपये पन्नास मात्र) भरण्यास तयार आहे. तरी वरील संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये त्वरीत नोंदवावी अशी विनंती आहे.

आपला विश्वासू,

सचिव

**'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**

**कराड- मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४,ता.कराड,जि.सातारा**

**(परिशिष्ट - ब)**

(मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन)

**'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**

**...कराड - मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४.,ता.कराड,जि.सातारा**

**१) संस्थेचे नांव -'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**

**२) संस्थेचा पत्ता - द्वारा-प्राचार्य यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड ...कराड - मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४, ता.कराड, जि.सातारा**

**३) संस्थेचे उद्देश -**

१. संस्थेमार्फत सर्व आजी व माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणुन शैक्षणिक विषयावर चर्चा करून मार्ग काढणे.

२. लेक्चर्स, कॉन्फरन्स, वर्क्सशॉप, खेळ, सांस्कृतीक व सामाजिक चर्चासत्रे, व्याख्याने, स्नेहमेळावे, इत्यादी आयोजित करुन महाविद्यालयामध्ये सध्य स्थितीत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.

३. विद्यार्थी, पालक व महाविद्यालय यांच्यातील दुवा म्हणून काम करणे.

४. महाविद्यालयासाठी व शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आपल्या अनुभवांची देवाण-घेवाण करणे.

५. स्वयंरोजगार, नोकरी व उच्च शिक्षणासाठी मोफत मार्गदर्शन करणे.

६. नवीन पिढीमध्ये विविध तंत्रशिक्षणाचा प्रचार व्हावा यासाठी प्रयत्न करणे.

७. महाविद्यालयातील मागास व आर्थिक दृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रयत्न करणे.

८. महाविद्यालयाचे आजी-माजी विद्यार्थ्यांमध्ये स्नेह, बंधुभाव, सहकार्य व सेवाभावी वृत्ती विकसीत करण्यासाठी प्रयत्न करणे. त्यासाठी स्नेहमेळाव्यांचे व इतर सामाजिक उपक्रमांचे आयोजन करणे.

९. महाविद्यालयामध्ये सध्या शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी व सर्वांगीण विकासासाठी विद्यालय व संस्थेच्या संयुक्त विचाराने व सहकार्याने विविध प्रकल्प व उपक्रम राबविणे.

१०. माजी विद्यार्थ्यांचे सहकार्यातून महाविद्यालयासाठी आजच्या तांत्रिक व विज्ञान युगात शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या तांत्रिक व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करणे.

११. विद्यार्थ्यांना साहित्य, विज्ञान, माहिती तंत्रज्ञान व इतर ग्रंथ उपलब्ध करून देऊन समाज प्रबोधनासाठी वेगवेगळ्या विषयांवर निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा घेणे, आयोजन करणे.

१२. सामाजिक भावनेतून निसर्गाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न करणे व त्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपन करण्यास प्रोत्साहन देणे. वृक्षरोपनाचे महत्व पटविने, वृक्ष संवर्धन करुन पर्यावरणाचा समतोल राखणे.

१३. महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असणाऱ्याा विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धा परिक्षांचे मार्गदर्शन करणारे मोफत प्रशिक्षण वर्ग चालविणे व विद्यार्थ्यांसाठी स्पर्धात्मक परिक्षांचे आयोजन करणे.

१४. सुशिक्षीत बेरोजगारांना व्यवसायासंबंधी आवश्यक असणारे औद्योगीक, व्यवसायीक प्रशिक्षणाद्वारे मार्गदर्शन करणे व त्यांना सक्षम बनविणेसाठी प्रयत्न करणे.

१५. नैसर्गिक आपत्तीमध्ये आपादग्रस्तांना आवश्यक असणारी संपूर्ण मदत करणे.

वरील सर्व उद्देश शासनाच्या संबंधीत शासकीय खात्यांचे पूर्वपरवानगीने व धर्मादाय हेतुने राबविणेत येतील.

अध्यक्ष　　　　उपाध्यक्ष　　　　सचिव

४) '' **यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''** ....कराड- **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५१२४., **ता.कराड, जि.सातारा** या संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेची व्यवस्था व कारभार सोपविण्यात आलेला आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळातील सभासदांचे नांव व पत्ता, हुद्दे, वय, व्यवसाय व राष्ट्रीयत्व खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | सभासदांचे नांव व पत्ता | हुद्दा | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला<br>रा.सुपर मार्केट जवळ,प्लॉट नं.४६३/२०<br>शनिवारपेठ, कराड, ता.कराड,जि.सातारा | अध्यक्ष | ६१ | सेवानिवृत्त | भारतीय |
| २. | डॉ.अशोक शंकरराव डुबल<br>रा. ३१३, शुक्रवार पेठ, कराड,<br>ता.कराड, जि.सातारा | उपाध्यक्ष | ६४ | वैद्यकीय | -''- |
| ३. | श्री. सुदीप दिलीप करांडे<br>रा.मु.पो.बनवडी, ता.कराड, जि.सातारा | सचिव | ३२ | नोकरी | -''- |
| ४. | डॉ.जयसिंग उत्तमराव पाटील<br>रा.सी-६७, पाचवा मजला, सिल्वर पाम<br>बिल्डिंग, कराड-मसूर रोड, सैदापूर,<br>ता.कराड, जि.सातारा | खजिनदार | ४० | -''- | -''- |
| ५. | डॉ. भरत एकनाथ महाडीक<br>रा.४८३/बी, चिंचणी, अंबक,<br>ता.कडेगांव, जि.सांगली | सदस्य | ५५ | -''- | -''- |
| ६. | श्रीमती डॉ.सुषमा आनंदराव किर्तने<br>रा.१९१७, एम.एस.ई.बी.रोड, अंजनी<br>गॅस गोडाऊन समोर, हजारमाची,<br>ता.कराड, जि.सातारा | -''- | ५३ | -''- | -''- |
| ७. | श्रीमती किर्ती अनिल यादव<br>रा.मु.पो.यशवंतनगर,ता.कराड,जि.सातारा | -''- | ३६ | -''- | -''- |
| ८. | श्री. प्रवीण जवानमलजी ओसवाल<br>रा.१८/अ, सोमवार पेठ, कराड,<br>ता.कराड, जि.सातारा | -''- | ४९ | व्यापार | -''- |
| ९. | श्री. संजय सोपान चव्हाण<br>रा.मु.पो.कोपर्डे हवेली, ता.कराड,जि.सातारा | -''- | ५४ | शेती | -''- |
| १०. | श्री. प्रशांत भागवत चव्हाण<br>रा.मु.पो.रिसवड, ता.कराड,जि.सातारा | -''- | ३९ | नोकरी | -''- |
| ११. | श्री. संतोष जयवंत मेढेकर<br>रा.मु.पो. हजारमाची, ता.कराड,जि.सातारा | -''- | ३४ | व्यापार | -''- |

अध्यक्ष    उपाध्यक्ष    सचिव

५) आम्ही खाली सह्या करणार '' **यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''** कराड- **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५ १२४ **,ता.कराड, जि.सातारा** या संस्थेचे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत असलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून आम्ही एकत्र येवून वरील उद्देशांच्या अनुषंगाने कार्य करण्यासाठी '' **यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''** कराड- **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५ १२४ **,ता.कराड, जि.सातारा** ही संस्था आज दिनांक / /२०२४ रोजी स्थापन केली असून या संस्थेची नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर खाली सह्या केल्या आहेत.

| अ.नं. | सभासदाचे नाव | सह्या |
|---|---|---|
| १. | श्री.अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला | |
| २. | डॉ.अशोक शंकरराव डुबल | |
| ३. | श्री. सुदीप दिलीप करांडे | |
| ४. | डॉ.जयसिंग उत्तमराव पाटील | |
| ५. | डॉ. भरत एकनाथ महाडीक | |
| ६. | श्रीमती डॉ.सुषमा आनंदराव किर्तने | |
| ७. | श्रीमती किर्ती अनिल यादव | |
| ८. | श्री. प्र[illegible] जवानमलजी ओसवाल | |
| ९. | श्री. संजय सोपान चव्हाण | |
| १०. | श्री. प्रशांत भागवत चव्हाण | |
| ११. | श्री. संतोष जयवंत मेढेकर | |

वरील सह्या करणाऱ्या इसमांना मी ओळखतो व त्यांनी माझ्या समक्ष या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

NOTARY ADV. ARJUNRAO D. PUJARI REG.NO.10566 EXP. DT. 21 NOV 2028 GOVT. OF INDIA

स्थळ : सातारा

तारीख – / /२०२४ ( वकील/सनदी लेखापाल /नोटरी)

ADV. ARJUNRAO D. PUJARI
NOTARY GOVT. OF INDIA
REG. NO. 10566, KARAD.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

## परिशिष्ठ ''क''

### ।।नियम व नियमावली ।।

### '' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''

### कराड- मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४, ता.कराड, जि.सातारा

**१) नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या :-**

| | | |
|---|---|---|
| संस्था | – | संस्था म्हणजे '' **यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''** |
| उद्देश | – | मेमोरॅन्डम ऑफ असोशिएशन मधील कलम नं.३ ला नमुद केलेले सर्व उद्देश. |
| सभासद | – | या नियमावलीतील तरतुदीनुसार सभासदत्वाची वर्गणी भरलेली व सभासदत्वास कार्यकारी मंडळाने मंजुरी दिली आहे अशी व्यक्ती. |
| कार्यकारी मंडळ | – | संस्थेचा कारभार या नियमावलीप्रमाणे ज्या समितीवर सोपविला आहे असे मंडळ. |
| कार्यकारी मंडळाची सभा | – | कार्यकारणीतील सदस्यांची बोलविणेत आलेली सभा. |
| वार्षिक सर्वसाधारण सभा | – | संस्थेच्या सर्व सभासदांची दरवर्षी घेणेत येणारी सभा. |
| संस्था नोंदणी कायदा | – | संस्था नोंदणी अधिनियम १८६० या भारत सरकारचा कायदा व त्या खालील नियम. |
| अनुसूची | – | संस्था नोंदणी नियम १९७१ (महाराष्ट्र) या नियमावली नुसार विहीत करणेत आलेल्या अनुसूची १,२,६. |

**२) कार्यक्षेत्र** – संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य राहील.

**३) हिशोबाचे वर्ष** – संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

**४) सभासद यांची नोंदणी पध्दत –**

या संस्थेची ध्येय धोरणे व उद्देश मान्य असणाऱ्या शिवाजी एज्युकेशन सोसायटी कराड या संस्थेचे यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराड या विद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेल्या व घेतलेल्या आजी–माजी १८ वरील भारतीय नागरीकत्व असणाऱ्या स्त्री व पुरुष विद्यार्थ्यांस या संस्थेचे सभासद होता येईल. सभासदत्वासाठी संस्थेच्या दोन सभासदांच्या शिफारशीसह व संस्थेने ठरविलेल्या सभासदत्वाच्या फी व प्रवेश फीसह अध्यक्ष / सचिव यांचेकडे अर्ज करावा. सभासदत्वासाठी आलेला अर्ज कार्यकारी मंडळाच्या सभेमध्ये मंजूरीसाठी ठेवला जाईल. कार्यकारी मंडळाच्या सभेत सदर अर्ज बहुमताने मंजूर केल्यानंतर अर्जदार व्यक्तीस सभासदत्व प्राप्त होईल. सभासदत्व देणे अगर नाकारणेचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. सभासदत्व नाकारलेस त्याचे संयुक्तरित्या योग्य ते कारण देणे बंधनकारक राहील. अशा नाकारलेल्या अर्जास सर्वसाधारण सभेची मंजूरी घेतली जाईल.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

५) **सभासदांचे प्रकार :-**

१) **संस्थापक सभासद -**

संस्था स्थापनेस जे सभासद कारणीभूत असतील व ज्ञापनावर सह्या केलेल्या असतील अशा सर्व सभासदांस संस्थापक सभासद असे समजणेत येईल. मात्र त्यांनी आजीव सभासदाची वर्गणी भरली असली पाहिजे.

२) **आजीव सभासद -**

**प्रवेश फी** रुपये २५/- सह्न रुपये **१०००/-** एकाच रकमेने देणारी व्यक्ती.

३) **सामान्य सभासद -**

**प्रवेश फी** रुपये २५/- सह्न वार्षिक वर्गणी रु.२००/- देणारी व्यक्ती.

४) **सन्माननीय सभासद -**

विविध क्षेत्रातील तज्ञ, प्रतिष्ठीत व संस्थेसंबंधी विशेष आस्था व हितसंबंध असणाऱ्या व्यक्ती अगर संस्थेस सन्माननीय सभासदत्व बहाल करणेत येईल. या सन्माननीय सभासदाकडून संस्थेसाठी आवश्यक ती सर्व मदत घेता येईल. परंतू त्यांना संस्थेच्या निवडणुकीमध्ये अगर सभेमध्ये मतदानाचा अधिकार राहणार नाही.

६) **(अ) सभासदांचे हक्क -**

१) सभासदास संस्थेच्या कोणत्याही कार्यात सहभागी होता येईल.

२) सन्माननीय सभासद यांच्या खेरीज इतर सभासदांना वार्षिक सभेत हजर राहून मतदान करता येईल.

३) संस्थेच्या कार्यासंबंधी विचारपूस व चर्चा करता येईल.

४) संस्था उर्जितावस्थेत येण्याचे दृष्टीने मार्गदर्शन करता येईल.

**(ब) सभासदत्व रद्द होणे -**

१) एखादा सभासद निधन पावल्यास, वेडा अगर दिवाळखोर झालेस त्याचे सभासदत्व रद्द केले जाईल.

२) सभासदत्वाचा राजीनामा संस्थेच्या कार्यकारी मंडळाने मंजूर केल्यास त्याचे सभासदत्व रद्द केले जाईल.

३) सभासदास फौजदारी व नैतिक अध:पतनाच्या गुन्ह्याखाली शिक्षा झालेली असल्यास अगर एखाद्या सभासदाने संस्थेचे नियम व हित यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष बाधा येईल असे कृत्य केले असल्यास त्या सभासदाचे सभासदत्व कार्यकारी मंडळाचे शिफारशीवरुन सर्वसाधारण सभेत हजर सभासदांच्या २/३ मताधिक्याने कायमचे अगर काही मुदतीपुरते रद्द केले जाईल. परंतु तत्पूर्वी अशा सभासदास आपली बाजू मांडणेची संधी दिली जाईल.

४) एखाद्या सभासदाने अगर अनेक सभासदांनी एखाद्या सभासदाविरुध्द अविश्वास ठराव आणलेस व तो ठराव सर्वसाधारण सभेमध्ये २/३ बहुमताने मंजूर झालेस अशा सभासदाचे सभासदत्व रद्द करणेबाबत व अधिकारपद असेल तर ते काढून घेणेबाबत कार्यवाही करणेत येईल.

अध्यक्ष      उपाध्यक्ष      सचिव

५) जर एखाद्या सभासदाने संस्थेची वार्षिक वर्गणी वर्ष संपलयानंतर ३ महिन्याचे आत आणून न दिल्यास त्या सभासदाचे सभासदत्व कार्यकारी मंडळाचे सभेत बहुमताने रद्द करणेत येईल.

६) जर एखाद्या सभासदाने संस्थेच्या दृष्टीने बाधक असे कोणतेही कृत्य केल्यास तसेच संस्थेच्या कामकाजातील गुप्त गोष्टींची वाच्यता बाहेर केल्यास अथवा त्यास वर्तमानपत्रात प्रसिध्दी दिल्यास, तसेच त्या गोष्टींबाबत जाहीर सभा घेणे, प्रचार करणे, पोलीसांकडे जाणे या सर्व गोष्टी सभासदाचे सभासदत्व रद्द करणेस कारणीभूत असतील.

७) सदरील सभासद पदाधिकारी हे सलग तीन मिटींगला सबळ कारणाशिवाय गैरहजर राहिल्यास त्याचे सभासदत्व, पद संपुष्टात येईल.

७) अ) **सर्वसाधारण सभा, तिचे अधिकार आणि कार्ये –**

सन्माननीय सभासदांव्यतिरिक्त सर्व सभासदांचा समावेश सर्वसाधारण सभेमध्ये होईल. संस्थेची सर्वसाधारण सभा संस्थेचे आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्याच्या आत घेतली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत वार्षिक सभा सहा महिन्यात झाली नाही तर अध्यक्षांनी ती सभा आपल्या अधिकारामध्ये बोलाविली पाहिजे. वार्षिक सर्वसाधारण सभेची तारीख, वेळ, ठिकाण कार्यकारी मंडळ ठरवेल.

ब) **सर्वसाधारण सभेचे अधिकार व कार्ये –**

१) मागिल सभेचा वृत्तांत तसेच कार्यकारी मंडळाने सादर केलेला अहवाल, जमाखर्च, ताळेबंदपत्रक अंदाजपत्रक मंजूर करणे.

२) पुढील वर्षासाठी ऑडीटर किंवा चार्टर्ड अकौंटंट, कायदेशीर सल्लागार, तज्ञ सल्लागार नेमणे

३) दर पाच वर्षानंतर कार्यकारी मंडळाची निवड करणे.

४) पोट नियमांमध्ये दुरुस्ती असल्यास त्यास मान्यता देणे.

५) ध्येय, धोरण व कार्ये या विषयी चर्चा करणे.

६) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणारी व इतर सभासदांनी सभेपूर्वी नोटीस देऊन सभेपुढे आणलेली कामे करणे.

क) **बहुमताने ठराव संमत –**

१) सभेपुढील प्रत्येक कामाचा निर्णय हा बहुमताने घेतला पाहीजे.

२) प्रत्येक सभासदास एकच मत देण्याचा अधिकार राहील.

३) अनुकूल वा प्रतिकूल असे समसमान मत झाल्यास, सभेच्या अध्यक्षांस सभासद या नात्याने असलेल्या मतांशिवाय एक जादा निर्णायक मत (कास्टींग वोट) देता येईल.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

८) **सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या –**

सर्वसाधारण सभेची सुचना (नोटीस) अध्यक्ष व सचिव या दोघांच्या सहीने काढावी . सर्वसाधारण सभेची नोटीस सभेपूर्वी किमान १५ दिवस अगोदर मिळेल अशी दिली पाहिजे. सभेची नोटीस समक्ष देवून नोटीस पोहोचल्याबद्दलच्या सह्या नोटीस बुकात घ्याव्यात. समक्ष नोटीस न दिली गेल्यास ती सभासदांचे पत्त्यावर रजिस्टर पोस्टाने पाठवावी. नियम व नियमावलीतील दुरुस्ती असेल तर त्याची नोटीस कमीत कमी २१ दिवस अगोदर मिळेल अशी दिली पाहिजे. वार्षिक सर्वसाधारण सभेची गणसंख्या एकूण सभासदांच्या २/३ इतकी राहील.

कोरम अभावी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने बोलाविली जाईल. त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही व तिचे कामकाज कायदेशीर ठरेल. परंतु तशा प्रकारची सुचना सभेच्या नोटीसमध्ये दिली असली पाहीजे.

९) **विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये –**

कार्यकारी मंडळास सर्व सभासदांपुढे एखादी महत्वाची गोष्ट ठेवावयाची असल्यास अगर कामकाजाच्या दृष्टीने एखादा महत्वाचा निर्णय घ्यावयाचा असल्यास व त्यासाठी सर्वसाधारण सभेची आवश्यकता असल्यास अशा विशेष प्रसंगी सर्वसाधारण सभा घेता येईल. त्यावेळी वार्षिक सर्वसाधारण सभेचे सर्व नियम हेच विशेष सर्वसाधारण सभेचे नियम राहतील.

१०) **संस्थेचे कार्यकारी मंडळ पदाधिकारी यांची रचना –**

संस्थेचे सुरुवातीचे कार्यकारी मंडळ११ सदस्यांचे राहील. भविष्य काळात कार्यकारी मंडळात कमीतकमी ११ सदस्य राहतील व त्यामध्ये जास्तीत जास्त १३ पर्यंत वाढ करता येईल. निवडून आलेले कार्यकारी मंडळ आपल्या मधून खालीलप्रमाणे पदाधिकारी निवडतील.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अध्यक्ष | – | १ |
| २) | उपाध्यक्ष | – | १ |
| ३) | सचिव | – | १ |
| ४) | खजिनदार | – | १ |

व बाकीचे सदस्य राहतील.

११) **कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूकीची पध्दत –**

अ) कार्यकारी मंडळाची निवड दर पाच वर्षांनी संस्थेच्या वार्षीक सर्वसाधारण सभेत बहुमताने करणेत येईल.

ब) कार्यकारी मंडळाचे सदस्य संख्येपेक्षा कमी उमेदवारी अर्ज आलेस अशा प्रसंगी कार्यकारी मंडळाच्या सदस्यांच्या संख्येची पुर्तता संस्थेच्या इतर सभासदामधून करणेत येईल.

१२) **कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे –**

**अध्यक्ष –**

१) कार्यकारी मंडळाच्या सभेचे तसेच सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष स्थान स्विकारुन सभा नि:पक्षपातीपणे पार पाडणे.

अध्यक्ष　　　　उपाध्यक्ष　　　　सचिव

२) सभेची तारीख, वेळ व ठिकाण निश्चित करणे.

३) सभेचे कामकाज सांभाळणे व कामकाजावर देखरेख ठेवणे.

४) समान मत विभागणी झालेस निर्णायक जादा मत देणे.

५) मा.सचिव यांचेमार्फत मांडणेत आलेला ठराव कार्यकारी मंडळाच्या सभेत व सर्वसाधारण सभेत मंजूरीसाठी ठेवणे.

६) सचिव यांनी संस्थेचे कामकाज सुरळीत व नियमीत पार पाडले नाही तर स्वत:च्या अधिकारात सचिवाची सर्व कार्ये पार पाडणे.

**उपाध्यक्ष –**

अध्यक्ष यांच्या गैरहजेरीत अध्यक्ष यांची सर्व कामे पहाणे तसेच अध्यक्ष यांना संस्थेच्या दैनंदिन कामकाजामध्ये मदत करणे.

**सचिव –**

१) संस्थेच्या ध्येय धोरणानुसार व कार्यकारी मंडळाच्या सुचनेनुसार संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणे.

२) संस्थेसाठी पत्रव्यवहार करणे व दप्तर सांभाळणे.

३) वेळच्या वेळी कार्यकारी मंडळाच्या सभा तसेच संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष यांच्या परवानगीने बोलाविणे, त्या सभांचा वृत्तांत ठेवणे.

४) कार्यकारी मंडळ व नोकरवर्ग यांचा दुवा म्हणून म्हणून कार्य करणे. नोकरवर्गाच्या दैनंदिन कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे तसेच संस्थेचा कायदेशीर प्रतिनिधी म्हणून काम करणे.

**खजिनदार –**

१) संस्थेचे दैनंदिन तसेच वार्षिक जमाखर्च ठेवणे.

२) सभासदांची वर्गणी अगर इतर येणे रकमा जमा करुन, खर्चाची बिले अध्यक्ष वा कार्यकारी मंडळ यांच्या संमतीने चुकती करणे.

३) हिशेबाच्या संबंधीचे रेकॉर्डची संपूर्ण जबाबदारी खजिनदार यांचेवर राहील.

४) मासिक, वार्षिक अंदाजपत्रक तयार करुन सचिव/ अध्यक्षांच्या पुढे सादर करणे.

५) संस्थेने ठरविलेल्या बँकेत नियमित जमा होणारी रक्कम जमा करुन त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कामे पाहणे.

६) खजिनदार यांना दैनंदिन खर्चासाठी जास्तीत जास्त रक्कम रु.१०००/– पर्यंत हाती ठेवता येईल.

**कार्यकारी सदस्य –**

१) सर्व कार्यकारी सदस्यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे व सचिवांना त्यांचे कार्यात परवानगीनुसार आवश्यकतेप्रमाणे मदत करावी.

२) सर्व सभांना उपस्थित रहाणे.

३) संस्थेच्या कामकाजावर लक्ष ठेवणे.

४) निवडणुकीमध्ये मतदान करणे.

५) संस्थेस सुयोग्य निर्णय घेण्यास / योग्य निर्णय पारित करण्यास मदत करणे.

अध्यक्ष      उपाध्यक्ष      सचिव

६) संस्थेचे नांव, कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहचविणे कामी सर्व कामे करणे.
संस्थेच्या सर्व कामकाजासाठी / निर्णयांसाठी कार्यकारी मंडळातील सर्व विश्वस्त जबाबदार असतील.

**१३) कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा –**

अ) कार्यकारी मंडळाची सभा तीन महिन्यातुन एकदा तरी बोलाविली पाहीजे.

ब) संस्थेच्या कार्यकारी मंडळातील कमीत कमी १/३ सदस्यांनी विशिष्ट कारणाकरीता सभेची लेखी मागणी अध्यक्षांकडे केल्यास, अध्यक्षांनी त्यांना मागणी अर्ज मिळालेपासून १५ दिवसांचे आत सभासदांच्या मागणीप्रमाणे सभा बोलवावी. अध्यक्ष यांनी सदर सभा १५ दिवसांत बोलविली नाही तर अशा सभेची मागणी करणारे कार्यकारणी सदस्य अशी मागणी सभा बोलावू शकतील. पण मागणी करणारे कार्यकारणी सदस्यांनी कार्यकारी मंडळाचे इतर सदस्यांना कमीत कमी ७ दिवस अगोदर नोटीस मिळेल अशी दिली पाहिजे. सदर नोटीसीमध्ये सभेचे स्थळ, दिनांक, वेळ व कारणे यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. अशा मागणी सभेत कार्यकारी मंडळाच्या सभेचे सर्व नियम पाळणे बंधनकारक राहील.

क) संस्थेच्या एकूण सभासद संख्येच्या २/३ सभासदांनी लेखी मागणी केलेस अध्यक्षांना सर्वसाधारण मागणी सभा बोलवावी लागेल. अध्यक्ष यांनी अशी मागणी सभा मुदतीत न बोलविल्यास मागणी करणारे सभासद अशी सभा बोलावू शकतात. अशा सर्वसाधारण मागणी सभेस वार्षिक सर्वसाधारण सभेचे सर्व नियम पाळणे बंधनकारक राहील.

ड) कार्यकारी मंडळाची तातडीची सभा २४ तासाची नोटीस देवून बोलविता येईल.

इ) संस्थेला खरोखरच उपयोगी पडतील अशा व्यक्तींना कार्यकारी मंडळाचे सभेत तसेच सर्वसाधारण सभेत अध्यक्षांच्या परवानगीने निमंत्रीत म्हणून बोलाविता येईल. परंतु त्यांना मतदानाचा कोणताही अधिकार राहणार नाही.

ई) कार्यकारी मंडळाच्या सभेस सल्लागार मंडळ, तसेच उपसमित्या नेमण्याचा तसेच ज्या कामकाजासाठी समिती नेमली आहे ते कामकाज पूर्ण झाल्यानंतर ती समिती बरखास्त करणेचा अधिकार राहील. अशा सल्लागार मंडळात अगर उपसमितीत किती व्यक्तींचा समावेश करावयाचा व कोणास सल्लागार मंडळात / उपसमितीत समाविष्ट करावयाचे याविषयी निर्णय कार्यकारी मंडळाच्या सभेत घेण्यात येईल.

**१४) कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या –**

१) कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना कार्यकारी मंडळाच्या सदस्यांना सभेपूर्वी ७ दिवस अगोदर मिळेल अशी दिली पाहिजे.

२) सभेची नोटीस समक्ष देवून नोटीस बुकात नोटीस मिळाल्याबद्दल सह्या घ्याव्यात.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

३) समक्ष नोटीस देणे शक्य नसेल अशा सभासदांना व परगावचे सभासदांना नोटीसा रजिस्टर पोस्टाने / ईमेलद्वारे पाठवाव्यात.

४) कार्यकारी मंडळाची सभेची गणसंख्या २/३ राहील. कोरम अभावी स्थगीत झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने पार पाडली जाईल. अशा सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही व तिचे कामकाज कायदेशीर ठरेल.परंतु नोटीशीत तशी सूचना देणे आवश्यक आहे.

**१५) कार्यकारी मंडळाचे निवडणुकीचे नियम –**

कार्यकारी मंडळाची निवड पाच वर्षांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत बहुमताने करणेत येईल. अशा सभेत मतदान हात वर करून घ्यावयाचे कि गुप्त मतदान पध्दतीने घ्यावयाचे याबाबतचा निर्णय सर्वसाधारण सभा घेईल. याबाबतीत सर्वसाधारण सभेचा निर्णय अंतिम व निर्णायक राहिल. प्रत्येक मतदारास एकच मत देण्याचा अधिकार राहिल. जुन्या कार्यकारी मंडळातील कोणत्याही सदस्यांस पुन्हा निवडणुकीत उभे राहता येईल. जे सभासद संस्थेच्या निवडणुकीपूर्वी कमीत कमी २ वर्षे सभासद आहेत, ज्याची वर्गणी थकलेली नाही. त्यास निवडणुकीस उभे राहता येईल, व मतदानाचा अधिकार राहील.

**१६) कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत –**

कार्यकारी मंडळातील कोणत्याही कारणाने रिकामी झालेली जागा उर्वरित मुदतीकरीता कार्यकारी मंडळास बहुमताने भरता येईल.

**१७) कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये –**

१) संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणे, नोकरवर्ग यांची नेमणूक करणे, सेवानिवृत्त करणे, संस्थेच्या देण्याघेण्याचे व्यवहार पाहणे व नवीन उपसमित्या नेमणे व संस्थेच्या ध्येय धोरणानुसार कामे करणे.

२) संस्थेचे जमाखर्च चार्टर्ड अकौंटंट यांचेकडून तपासून घेवुन पाठविणेची तजविज करणे.

३) पुढील कार्याची दिशा, अंदाजपत्रक तयार करुन वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.

४) संस्थेच्या नियम व नियमावलीतील दुरुस्ती नवीन कार्य अगर इतर शिफारशी वार्षिक सर्वसाधारण सभेत करणे.

५) वार्षिक सभेने केलेले ठराव आदेश व धोरण विषयक गोष्टी अंमलात आणणे.

६) कार्यकारी मंडळातील सभासदांची यादी सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियम कलम ४ व १९७१ च्या संस्था नोंदणी नियम क्र. अन्वये अनुसूची १ मध्ये मा. सहा. संस्था निबंधक, सातारा यांचेकडे दरवर्षी न चुकता पाठविणेची जबाबदारी कार्यकारी मंडळावर आहे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

७) संस्थेने नेमलेल्या संबंधीत व्यक्तिंची यादी वा विवरण सन १८६० च्या संस्था नोंदणी नियम क्र.८ अन्वये अनुसूची क्र.२ चे नमुन्यात मा. सहा. संस्था निबंधक, सातारा, यांचेकडे दरवर्षी न चुकता पाठविणेत येईल, अनुसूची क्र.२ चा नमुना सोबत जोडला आहे.

८) संस्थेच्या निधीचा विनीयोग संस्थेच्या उद्देशांवर योग्य रितीने खर्च करणे.

९) सर्वसाधारण सभेत मंजूर झालेल्या आर्थिक व्यवहारांची अंमलबजावणी करणे.

१०) संस्थेच्या स्थावर व जंगम मालमत्तेची नोंद असणारी नोंदवही ट्रस्ट कायद्यातील तरतुदींनुसार ठेवणे.

११) संस्थेच्या कार्याच्या दृष्टीने उपयुक्त अशी स्थावर मालमत्ता ट्रस्ट कायद्यातील तरतुदीनुसार खरेदी करणे. तसेच संस्थेच्या उद्देशपूर्तीसाठी आवश्यकतर संस्थेची स्थावर मालमत्ता ट्रस्ट कायद्यातील तरतुदीनुसार व मा.सहा. संस्था निबंधक, सातारा यांच्या पूर्व परवानगीने तारणगहाण ठेवणे, तबदील करणे इ.

**१८) संस्थेचा निधी, मिळकत व विनीयोग –**

सभासद फी, वर्गणी, अनुदान, बँकेचे व्याज, प्रवेश शुल्क, देणगी, बक्षिस, दान, संस्थेच्या मालमत्तेपासून येणारे उत्पन्न हे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत असतील. संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी व त्यासाठीच्या प्रशासनिक कामकाजासाठी त्याचा विनियोग करण्यांत येईल. तसेच संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी व हितासाठी स्थावर मिळकत विकत घेणे, हस्तांतरीत करणे, कराराने घेणेचा हक्क आहे. परंतू अशा स्थावर / जंगम मालमत्तेचा / मिळकतीचा विनियोग संस्थेच्या व सभासदांच्या हितासाठीच केला जाईल. आवश्यक त्या ठिकाणी मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त सो सातारा विभाग, सातारा यांची कायद्याप्रमाणे मंजुरी घेण्यात येईल.

**१९) उद्दीष्ट निहाय खर्चाची तरतुद ( टक्केवारी प्रमाणे ) –**

१. संस्थेचे ज्या उत्पन्नाच्या साधनांतून फंड अथवा निधी जमा केला जाईल त्यातुन संस्थेवर असलेली जबाबदारी खर्च वजा जाता राहीलेल्या शिल्लक रक्कमेतून उद्देशांत नमुद केलेल्या कारणांसाठी खर्च करण्यांत येईल.

२. शैक्षणिक व वैद्यकीय कारणांसाठी ३५%, तसेच विद्यार्थी वसतीगृह, धर्मशाळा, सुखसोयी, शिष्यवृत्ती, फी तसेच वैद्यकीय उपचारांसाठी मदत यांवर २५% याप्रमाणे किंवा त्याचे मर्यादेत खर्च करुन राहीलेली रक्कम संस्थेच्या इतर उद्देशपुर्तीसाठी किंवा योग्य त्या कारणांवर खर्च करण्यांत येईल.

३. आवश्यकतेनुसार सदर खर्चाच्या प्रमाणात कार्यकारी मंडळाच्या ठरावान्वये बहुमताने बदल केला जाऊ शकेल. मात्र ठरावामध्ये या बाबतची ठोस कारणे नमुद करावी लागतील.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

**२०) कर्ज किंवा ठेवी या संबंधी तरतुद –**

संस्थेस कर्ज काढावयाचे असल्यास बॉम्बे पब्लीक ट्रस्ट अॅक्ट १९५० चे कलम ३६ नुसार मा. धर्मादाय सह आयुक्त पुणे विभाग पुणे यांचे पूर्व परवानगीने कर्ज काढता येईल . तसेच याच कायद्याचे कलम ३५ नुसार ठेवी ठेवता येतील.

**२१) स्थावर मालमत्ता खरेदी वा विक्री करणेसंबंधी बाबतची तरतुद –**

संस्थेस स्थावर मालमत्ता खरेदी करावयाची असलेस बॉम्बे पब्लीक ट्रस्ट अॅक्ट १९५० चे कलम ३६ नुसार खरेदी करता येईल. तसेच याच कायद्याचे कलम ३६ नुसार स्थावर मालमत्तेची विक्री सुध्दा करता येईल. मात्र अशा व्यवहारास मा. धर्मादाय सह आयुक्त पुणे विभाग पुणे यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

**२२) बँक खाते –**

संस्थेच्या रक्कमा या संस्थेच्या नावाने उघडलेल्या खात्यामध्ये शेड्युल्ड किंवा मान्यताप्राप्त राष्ट्रीयकृत बँकेमध्ये ठेवाव्यात अगर गुंतवाव्यात. संस्थेच्या कोणत्याही रक्कमा कोणाही खाजगी व्यक्ती अथवा खाजगी संस्थेकडे ठेव म्हणून ठेवू नयेत किंवा गुंतवू नयेत. संस्थेचे बँक खात्यावरील व्यवहार हे अध्यक्ष, सचिव व खजिनदार यापैकी कोणाही दोघा पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त सहिने करावा.

**२३) सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत –**

संस्थेच्या सभासदांची यादी संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या तरतुदीनुसार व सन १९७१ च्या संस्था नोंदणी नियम १५ नुसार अनुसूची ६ मध्ये ठेवणेत येईल.

**२४) नियम व नियमावलीतील बदल करण्याची तरतुद –**

कार्यकारी मंडळाने अगर सभासदांनी चालू नियम व नियमावलीमध्ये दुरुस्ती सुचविली असेल तर ती दुरुस्ती वार्षीक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या २/३ बहुमताने मंजुर करणेत येईल.मात्र अशा दुरुस्तीचा मसुदा सर्व सभासदांना सदर सभेच्या नोटीसीसोबत दिला गेला पाहिजे. सदर दुरुस्ती आयकर अधिनियमातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्यांना अधिन राहून सक्षम अधिकाऱ्यांच्या आणि सक्षम न्यायालयाच्या पुर्व परवानगीने करता येईल. मात्र अशा दुरुस्तीस संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२, व १२ अ मधील तरतुदीनुसार मा. सहा. संस्था निबंधक, सातारा क्षेत्र यांचेकडून मंजूरी घ्यावी लागेल.

**२५) संस्थेच्या नावात, कार्यक्षेत्रात, किंवा उद्देशांमध्ये बदल करण्याची तरतूद –**

संस्थेच्या नावामध्ये किंवा उद्देशामध्ये बदल करावयाचा झाल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२, व १२ अ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेत येईल. आयकर

**अध्यक्ष** **उपाध्यक्ष** **सचिव**

अधिनियमातील तरतुदीनुसार प्रचलित कायद्यांना अधिन राहून सक्षम अधिकाऱ्यांच्या आणि सक्षम न्यायालयाच्या पूर्व परवानगीने मा.सहा.संस्था निबंधक, सातारा क्षेत्र यांची बदलास मंजूरी घेणेत येईल.

**२६) विसर्जन –**

सदरची संस्था ही कोणत्याही परिस्थितीत पूर्णपणे विसर्जित करता येणार नाही. जर सदरची संस्था विसर्जीत करावयाची असेल तर संस्थेच्या सर्व सभासदांना १० दिवस अगोदर समक्ष अगर रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठवून त्यासंबंधीची माहिती देणेत येईल व त्यानंतरच ज्या संस्थेची ध्येय व उद्दीष्टे ही या संस्थेच्या उद्देशाप्रमाणे आहेत अशा संस्थेमध्ये सदर संस्थेचे विलीनीकरण करण्यात येईल. तसेच संस्थेच्या कोणत्याही स्थावर अगर जंगम मिळकती या सभासदांमध्ये वाटून घेता येणार नाहीत. तर सदरची संस्था ज्या संस्थेमध्ये विलीनीकरण केलेली आहे त्या संस्थेचा ताबा हा या सदर मिळकतींवर राहील. मात्र त्यासंदर्भात संस्था नोंदणी अधिनियम अधिनियम १८६० चे कलम १३ व १४ नुसार योग्य ती कार्यवाही करणेत येईल. मात्र अशी कार्यवाही करणेपूर्वी आयकर अधिनियमातील अंतर्भूत तरतुदीनुसार व संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे तरतुदीनुसार अभिप्रेत असणारी सर्व पूर्तता कार्यकारी मंडळाने करुन घेऊन त्यास मा.सहा. संस्था निबंधक, सातारा विभाग, सातारा यांची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

**<u>दाखला</u>**

प्रमाणित करण्यात येते की, **'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''** कराड- **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५१२४,**ता.कराड, जि.सातारा** या संस्थेच्या ज्ञापन व नियमावलीची सत्यप्रत आहे.

| अ.नं. | पदाधिकाऱ्याचे नांव | हुद्दा | सह्या |
|---|---|---|---|
| १. | श्री.अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला | अध्यक्ष | ------------ |
| २. | डॉ.अशोक शंकरराव डुबल | उपाध्यक्ष | ------------ |
| ३. | श्री. सुदीप दिलीप करांडे | सचिव | ------------ |
| ४. | डॉ.जयसिंग उत्तमराव पाटील | खजिनदार | ------------ |

स्थळ : सातारा

तारीख : / /२०२४

**अध्यक्ष** **उपाध्यक्ष** **सचिव**

**(परिशिष्ट - ड)**
**संमती - पत्र**

प्रति,
**मा. सहाय्यक संस्था निबंधक,**
सातारा विभाग, सातारा

विषय :- संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये

**'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**

कराड - **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५१२४**,ता.कराड, जि.सातारा**

महोदय,

आम्ही खाली सह्या करणार **'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''** कराड - **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५१२४**,ता.कराड, जि.सातारा** या संस्थेच्या पहिल्या कार्यकारी मंडळाचे सभासद असून सदर संस्थेच्या कार्यकारी मंडळावर संस्थेच्या ध्येय, धोरण उद्देश व नियमावलीप्रमाणे काम करण्यास आमची संमती आहे. तसेच संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये सदर संस्थेची नोंदणी होण्यास आमची संमती असून त्याचे प्रतिक म्हणून आमच्या स्वाक्षऱ्या या संमतीपत्रावर केल्या आहेत.

| अ.नं. | पदाधिकाऱ्याचे नांव | सह्या |
|---|---|---|
| १. | श्री.अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला | |
| २. | डॉ.अशोक शंकरराव डुबल | |
| ३. | श्री. सुदीप दिलीप करांडे | |
| ४. | डॉ.जयसिंग उत्तमराव पाटील | |
| ५. | डॉ. भरत एकनाथ महाडीक | |
| ६. | श्रीमती डॉ.सुषमा आनंदराव किर्तने | |
| ७. | श्रीमती किर्ती अनिल यादव | |
| ८. | श्री. प्रशांत जवानमलजी ओसवाल | |
| ९. | श्री. संजय सोपान चव्हाण | |
| १०. | श्री. प्रशांत भागवत चव्हाण | |
| ११. | श्री. संतोष जयवंत मेढेकर | |

वरील सह्या करणारे त्यांना मी ओळखतो, त्यांनी माझ्या समक्ष सह्या केल्या आहेत.

स्थळ :- सातारा
दिनांक : / /२०२४

NOTARY ADV. ARJUNRAO D. PUJARI REG. NO. 10566 EXP. DT. 21 NOV. 2028 GOVT. OF INDIA

(वकील / सनदी लेखापाल/नोटरी)

ADV. ARJUNRAO D. PUJARI
NOTARY GOVT. OF INDIA
REG. NO. 10566, KARAD.

**(परिशिष्ट - ई)**

प्रति,

**मा.सहाय्यक संस्था निबंधक,**

सातारा विभाग, सातारा

महोदय,

आम्ही खाली सह्या करणार '' **यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''** कराड-, **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५ १२४,**ता.कराड, जि.सातारा** या संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सभासद नमूद करीत आहोत की, या संस्थेच्या वतीने **श्री. सुदीप दिलीप करांडे, सचिव** यांना सदरहू संस्था नोंदणी नोंदविण्याबाबतचे कागदपत्रात आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार या पत्रकाने प्रदान करीत आहोत.

| अ.नं. | पदाधिकाऱ्याचे नांव | सह्या |
|---|---|---|
| १. | श्री.अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला | |
| २. | डॉ.अशोक शंकरराव डुबल | |
| ३. | श्री. सुदीप दिलीप करांडे | |
| ४. | डॉ.जयसिंग उत्तमराव पाटील | |
| ५. | डॉ. भरत एकनाथ महाडीक | |
| ६. | श्रीमती डॉ.सुषमा आनंदराव किर्तने | |
| ७. | श्रीमती किर्ती अनिल यादव | |
| ८. | श्री. प्रशांत जवानमलजी ओसवाल | |
| ९. | श्री. संजय सोपान चव्हाण | |
| १०. | श्री. प्रशांत भागवत चव्हाण | |
| ११. | श्री. संतोष जयवंत मेढेकर | |

स्थळ – सातारा

दिनांक – / /२०२४

वरील अधिकार पत्र स्विकारले.

**श्री.सुदीप दिलीप करांडे**

## <u>प्रतिज्ञापत्र</u>

आम्ही खाली सही करणार असे लिहुन देतो की, '' **यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''** कराड - **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५१२४,**ता.कराड, जि.सातारा** या किंवा या सारख्या नावाची दुसरी संस्था सातारा जिल्ह्यामध्ये अस्तित्वात नाही.

| **अ.नं.** | **पदाधिकाऱ्याचे नांव** | **सह्या** |
|---|---|---|
| १. | श्री.अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला | |
| २. | डॉ.अशोक शंकरराव डुबल | |
| ३. | श्री. सुदीप दिलीप करांडे | |
| ४. | डॉ.जयसिंग उत्तमराव पाटील | |
| ५. | डॉ. भरत एकनाथ महाडीक | |
| ६. | श्रीमती डॉ.सुषमा आनंदराव किर्तने | |
| ७. | श्रीमती किर्ती अनिल यादव | |
| ८. | श्री. प्रशांत जवानमलजी ओसवाल | |
| ९. | श्री. संजय सोपान चव्हाण | |
| १०. | श्री. प्रशांत भागवत चव्हाण | |
| ११. | श्री. संतोष जयवंत मेढेकर | |

मी खाली सही करणार **श्री.सुदीप दिलीप करांडे, सचिव** प्रतिज्ञापूर्वक इकरार करतो की, वरील माहिती माझे समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे.

सातारा

ता. / /२०२४

**सचिव**

**'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**

कराड, **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५१२४,**ता.कराड, जि.सातारा**

अनुसूची एक

(नियम ७ पहा)

संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या कलम नं. ४ मध्ये निर्देशित केलेल्या व्याप्तीचे वार्षिक यादीचे विवरणपत्र

संस्थेचे नाव व पत्ता :- **'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**

**कराड-, मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४,ता.कराड, जि.सातारा**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक :-

निवडणुकीची तारीख व ज्या कालावधीसाठी :- २०२४ ते २०२९

कार्यकारिणीची निवडण्यात आली तो कालावधी :- ५ वर्षे

ज्या कालावधीसाठी यादी तयार करण्यात आली असेल तो कालावधी :-

| अ.नं. | नांव व पूर्ण पत्ता | हुद्दा | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व | सही |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला<br>रा.सुपर मार्केट जवळ,प्लॉट नं.४६३/२०<br>शनिवारपेठ, कराड, ता.कराड,जि.सातारा | अध्यक्ष | ६९ | सेवानिवृत्त | भारतीय | -------- |
| २. | डॉ.अशोक शंकरराव डुबल<br>रा. ३१३, शुक्रवार पेठ, कराड,<br>ता.कराड, जि.सातारा | उपाध्यक्ष | ६४ | वैद्यकीय | -''- | -------- |
| ३. | श्री. सुदीप दिलीप करांडे<br>रा.मु.पो.बनवडी, ता.कराड, जि.सातारा | सचिव | ३२ | नोकरी | -''- | -------- |
| ४. | डॉ.जयसिंग उत्तमराव पाटील<br>रा.सी-६७, पाचवा मजला, सिल्वर पाम<br>बिल्डिंग, कराड-मसूर रोड, सैदापूर,<br>ता.कराड, जि.सातारा | खजिनदार | ४० | -''- | -''- | -------- |
| ५. | डॉ. भरत एकनाथ महाडीक<br>रा.४८३/बी, चिंचणी, अंबक,<br>ता.कडेगांव, जि.सांगली | सदस्य | ५५ | -''- | -''- | -------- |
| ६. | श्रीमती डॉ.सुषमा आनंदराव किर्तने<br>रा.१९१७, एम.एस.ई.बी.रोड, अंजनी<br>गॅस गोडाऊन समोर, हजारमाची,<br>ता.कराड, जि.सातारा | -''- | ५३ | -''- | -''- | -------- |
| ७. | श्रीमती किर्ती अनिल यादव<br>रा.मु.पो.यशवंतनगर,ता.कराड,जि.सातारा | -''- | ३६ | -''- | -''- | -------- |
| ८. | श्री. प्रशांत जवानमलजी ओसवाल<br>रा.१८/अ, सोमवार पेठ, कराड,<br>ता.कराड, जि.सातारा | -''- | ४९ | व्यापार | -''- | -------- |
| ९. | श्री. संजय सोपान चव्हाण<br>रा.मु.पो.कोपर्डे हवेली, ता.कराड,जि.सातारा | -''- | ५४ | शेती | -''- | -------- |
| १०. | श्री. प्रशांत भागवत चव्हाण<br>रा.मु.पो.रिसवड, ता.कराड,जि.सातारा | -''- | ३९ | नोकरी | -''- | -------- |
| ११. | श्री. संतोष जयवंत मेढेकर<br>रा.मु.पो.हजारमाची, ता.कराड,जि.सातारा | -''- | ३४ | व्यापार | -''- | -------- |

आपला विश्वासू

स्थळ : सातारा

दिनांक : / /२०२४

अर्जदार

**'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**

**कराड-, मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४,ता.कराड, जि.सातारा**

**अनूसुची – दोन**
**(नियम ८ पहा)**

दि. ३१ /०३ /२०२५ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कालावधीत संस्थेने नियुक्त केलेल्या व्यक्ती, त्यामध्ये नोकरीबाबत शर्ती वगैरेसंबंधी विवरणपत्र

संस्थेचे नांव :– '' **यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ**''
संस्थेचा पत्ता :– कराड, **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५१२४, **ता.कराड, जि.सातारा**
संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक :–

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | विद्यमान वेतनश्रेणी | अस्थायी आहे की स्थायी पूर्णकालीन आहे की अंशीकालीन | सध्याचे मासिक वेतन | मासीक महागाई वेतन व महागाई भत्ता | विशेष वेतन (कोणतेही असल्यास) | घरभाडे / वैद्यकीय, अन्य कोणतेही भत्ते असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८ |
| निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

| भविष्य निर्वाह निधीचे कोणतेही स्वरुप | संस्थेने पुरविलेल्या सोयी / सवलती | शेरा |
|---|---|---|
| ९ | १० | ११ |
| निरंक | निरंक | संस्था नव्याने स्थापन होत असल्याने वरील सर्व मुद्दे लागू नाहीत. |

अर्जदार

'' **यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ**''
कराड, **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५१२४, **ता.कराड, जि.सातारा**

**अनूसुची – सहा**

**(नियम १५ पहा)**

संस्थेच्या कार्यकारी मंडळाने ठेवावयाची सभासदांची यादी..

संस्थेचे नांव :– '' **यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ**''

संस्थेचा पत्ता :– कराड – **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५१२४, **ता.कराड, जि.सातारा**

सभादत्वाचा प्रकार :–आजीव सभासद — कालावधी (लागू असल्यास)

| अ.क्र. | सभासदाचे नांव व पत्ता | सध्याचे पद (असल्यास) | सभासद प्रवेशाची तारीख | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला<br>रा.सुपर मार्केट जवळ,प्लॉट नं.४६३/२०<br>शनिवारपेठ, कराड, ता.कराड,जि.सातारा | अध्यक्ष | / /२०२४ | -------- |
| २. | डॉ.अशोक शंकरराव डुबल<br>रा. ३१३, शुक्रवार पेठ, कराड,<br>ता.कराड, जि.सातारा | उपाध्यक्ष | –''– | -------- |
| ३. | श्री. सुदीप दिलीप करांडे<br>रा.मु.पो.बनवडी, ता.कराड, जि.सातारा | सचिव | –''– | -------- |
| ४. | डॉ.जयसिंग उत्तमराव पाटील<br>रा.सी–६७, पाचवा मजला, सिल्वर पाम<br>बिल्डिंग, कराड–मसूर रोड, सैदापूर,<br>ता.कराड, जि.सातारा | खजिनदार | –''– | -------- |
| ५. | डॉ. भरत एकनाथ महाडीक<br>रा.४८३/बी, चिंचणी, अंबक,<br>ता.कडेगांव, जि.सांगली | सदस्य | –''– | -------- |
| ६. | श्रीमती डॉ.सुषमा आनंदराव किर्तने<br>रा.१९१७, एम.एस.ई.बी.रोड, अंजनी<br>गॅस गोडाऊन समोर, हजारमाची,<br>ता.कराड, जि.सातारा | –''– | –''– | -------- |
| ७. | श्रीमती किर्ती अनिल यादव<br>रा.मु.पो.यशवंतनगर,ता.कराड,जि.सातारा | –''– | –''– | -------- |
| ८. | श्री. प्रशांत जवानमलजी ओसवाल<br>रा.१८/अ, सोमवार पेठ, कराड,<br>ता.कराड, जि.सातारा | –''– | –''– | -------- |
| ९. | श्री. संजय सोपान चव्हाण<br>रा.मु.पो.कोपर्डे हवेली, ता.कराड,जि.सातारा | –''– | –''– | -------- |
| १०. | श्री. प्रशांत भागवत चव्हाण<br>रा.मु.पो.रिसवड, ता.कराड,जि.सातारा | –''– | –''– | -------- |
| ११. | श्री. संतोष जयवंत मेढेकर<br>रा.मु.पो. हजारमाची, ता.कराड,जि.सातारा | –''– | –''– | -------- |

स्थळ : सातारा

दिनांक : / /२०२४

अर्जदार

'' **यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ**''

कराड– **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५१२४ **,ता.कराड, जि.सातारा**

## संमतिपत्र

**प्रति,**
मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त सो,
सातारा विभाग सातारा

महोदय,

**'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''** क२/३ - **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५ १२४ **,ता.कराड, जि.सातारा** नोंदविण्यासाठी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये दिनांक / /२०२४ रोजी अर्ज सादर केला आहे. त्या अर्जातील सर्व माहिती खरी आहे. आम्हांला त्यासंबंधी जास्त काही सांगावयाचे नाही. सदरच्या अर्जाची सुनावणीची स्वतंत्र नोटीस आम्हांला काढण्याची गरज नाही. नोंदणीविषयी प्रमाणपत्र अर्जदाराचे नांवे देण्यास आमची कोणतीही हरकत नाही.

कळावे, आपले

| अ.नं. | सदस्यांचे नांव | सही |
|---|---|---|
| १. | श्री.अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला | [signature] |
| २. | डॉ.अशोक शंकरराव डुबल | [signature] |
| ३. | श्री. सुदीप दिलीप करांडे | [signature] |
| ४. | डॉ.जयसिंग उत्तमराव पाटील | [signature] |
| ५. | डॉ. भरत एकनाथ महाडीक | [signature] |
| ६. | श्रीमती डॉ.सुषमा आनंदराव किर्तने | [signature] |
| ७. | श्रीमती किर्ती अनिल यादव | [signature] |
| ८. | श्री. प्रशांत जवानमलजी ओसवाल | [signature] |
| ९. | श्री. संजय सोपान चव्हाण | [signature] |
| १०. | श्री. प्रशांत भागवत चव्हाण | [signature] |
| ११. | श्री. संतोष जयवंत मेढेकर | [signature] |

वरील सर्व सह्या मी ओळखतो.

[signature]
**सचिव**

**'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**
**करावा, मसूर रोड, विद्यानगर,** ४१५ १२४ **,ता.कराड, जि.सातारा**

# <u>हमीपत्र</u>

प्रति,
मा. सहा. संस्था निबंधक सो,
सातारा विभाग, सातारा

**विषय :- नोंदणी प्रमाणपत्राच्या वापराबाबत संमतिपत्र.**

**'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**

**कराड, मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४, ता.कराड, जि.सातारा**

महोदय,

वरील विषयात नमुद केल्यानुसार आम्ही सादर करीत असलेली संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० नुसार नोंदणी झालेनंतर मिळणारे प्रमाणपत्राचा वापर आम्ही भिशी चालविणे, लकी ड्रॉ काढणे यासाठी तसेच बेकायदेशीर मार्गाने निधी जमा करणेसाठी करणार नाही असे आम्ही खाली सह्या करणार या हमीपत्राद्वारे लिहून देत आहोत.

आपले विश्वासू,

| अ.क्र. | नांव | सही |
|---|---|---|
| १. | श्री.अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला | |
| २. | डॉ.अशोक शंकरराव डुबल | |
| ३. | श्री. सुदीप दिलीप करांडे | |
| ४. | डॉ.जयसिंग उत्तमराव पाटील | |
| ५. | डॉ. भरत एकनाथ महाडीक | |
| ६. | श्रीमती डॉ.सुषमा आनंदराव किर्तने | |
| ७. | श्रीमती किर्ती अनिल यादव | |
| ८. | श्री. प्रशांत जवानमलजी ओसवाल | |
| ९. | श्री. संजय सोपान चव्हाण | |
| १०. | श्री. प्रशांत भागवत चव्हाण | |
| ११. | श्री. संतोष जयवंत मेढेकर | |

स्थळ : सातारा
तारीख : / /२०२४

अर्जदाराची सही

## हमीपत्र ( Undertaking )

प्रति,
**मा. सहाय्यक संस्था निबंधक सो,**
सातारा विभाग, सातारा

**विषय :-** **वैद्यकीय उद्देश राबविणेबाबत हमीपत्र**
**'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''** कराड - **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५१२४, **ता.कराड, जि.सातारा**

महोदय

आम्ही खाली सह्या करणारे '' **यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''** कराड, **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५१२४,**ता.कराड, जि.सातारा** या संस्थेचे सभासद असून उपरोक्त नमूद संस्थेच्या नोंदणीबाबतचा प्रस्ताव आम्ही आपले कार्यालयास सादर करीत आहोत. नमूद केलेप्रमाणे संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणी झाल्यानंतर संस्थेने वैद्यकीय उद्देश राबविणेसाठी धर्मादाय रुग्णालय अथवा वैद्यकीय केंद्र स्थापन केल्यास त्याबाबतची माहिती आपले कार्यालयास अवगत करणेत येईल. असे हमीपत्र आम्ही याद्वारे लिहून देत आहोत.

आपले विश्वासू,

| अ.क्र. | सभासदाचे पूर्ण नाव | सही |
|---|---|---|
| १. | श्री.अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला | ------------ |
| २. | डॉ.अशोक शंकरराव डुबल | ------------ |
| ३. | श्री. सुदीप दिलीप करांडे | ------------ |
| ४. | डॉ.जयसिंग उत्तमराव पाटील | ------------ |
| ५. | डॉ. भरत एकनाथ महाडीक | ------------ |
| ६. | श्रीमती डॉ.सुषमा आनंदराव किर्तने | ------------ |
| ७. | श्रीमती किर्ती अनिल यादव | ------------ |
| ८. | श्री. प्रशांत जवानमलजी ओसवाल | ------------ |
| ९. | श्री. संजय सोपान चव्हाण | ------------ |
| १०. | श्री. प्रशांत भागवत चव्हाण | ------------ |
| ११. | श्री. संतोष जयवंत मेढेकर | ------------ |

ठिकाण : सातारा
दिनांक : / /२०२४

अर्जदाराची सही

## प्रथम कार्यकारिणीची यादी

प्रति,
सहाय्यक संस्था निबंधक /सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सातारा विभाग, सातारा

**विषय – '' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ'' क्र.२१३,-मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४,ता.कराड, जि.सातारा चे प्रथम कार्यकारिणी बाबत .**

महोदय,

आम्ही खाली सह्या करणारे, **'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ'' क्र.२१३,-मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४,ता.कराड, जि.सातारा** या संस्थेचे प्रथम कार्यकारिणीचे सदस्य असून उपरोक्त प्रमाणे संस्थेच्या नोंदणी बाबतचा प्रस्ताव आम्ही आपले कार्यालयास सादर करीत आहोत.

नमुद केलेप्रमाणे संस्थेबाबत व संस्था पदाधिकाऱ्यांबाबत पुढीलप्रमाणे माहिती सादर करीत आहोत.

**संस्थेचे नांव – '' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**
**संस्थेचा पत्ता – क्र.२१३,- मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४,ता.कराड, जि.सातारा**
**संस्थेचा दूरध्वनी क्रमांक – – नाही**
**संस्थेचा ई–मेल – – नाही**
**संस्थेचे संकेतस्थळ (वेब ॲड्रेस)– नाही**

| अ.क्र. | नांव व पत्ता | भ्रमणध्वनी मोबाईल क्रमांक | ईमेल | सह्या |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्ला<br>रा.सुपर मार्केट जवळ,प्लॉट नं.४६३/२०<br>शनिवारपेठ, कराड, ता.कराड,जि.सातारा | ७०२०४६३८८३ | mullaan111@gmail.com | |
| २. | डॉ.अशोक शंकरराव डुबल<br>रा. ३१३, शुक्रवार पेठ, कराड,<br>ता.कराड, जि.सातारा | | | |
| ३. | श्री. सुदीप दिलीप करांडे<br>रा.मु.पो.बनवडी, ता.कराड, जि.सातारा | ८७९६४५२०२३ | sudipsdk2020@gmail.com | |
| ४. | डॉ.जयसिंग उत्तमराव पाटील<br>रा.सी–६७, पाचवा मजला, सिल्वर पाम<br>बिल्डिंग, कराड–मसूर रोड, सैदापूर,<br>ता.कराड, जि.सातारा | | | |
| ५. | डॉ. भरत एकनाथ महाडीक<br>रा.४८३/बी, चिंचणी, अंबक,<br>ता.कडेगांव, जि.सांगली | | | |
| ६. | श्रीमती डॉ.सुषमा आनंदराव किर्तने<br>रा.१९१७, एम.एस.ई.बी.रोड, अंजनी<br>गॅस गोडाऊन समोर, हजारमाची,<br>ता.कराड, जि.सातारा | | | |
| ७. | श्रीमती किर्ती अनिल यादव<br>रा.मु.पो.यशवंतनगर,ता.कराड,जि.सातारा | | | |
| ८. | श्री. प्रशांत जवानमलजी ओसवाल<br>रा.१८/अ, सोमवार पेठ, कराड,<br>ता.कराड, जि.सातारा | | | |
| ९. | श्री. संजय सोपान चव्हाण<br>रा.मु.पो.कोपर्डे हवेली, ता.कराड,जि.सातारा | | | |
| १०. | श्री. प्रशांत भागवत चव्हाण<br>रा.मु.पो.रिसवड, ता.कराड,जि.सातारा | | | |
| ११. | श्री. संतोष जयवंत मेढेकर<br>रा.मु.पो. हजारमाची, ता.कराड,जि.सातारा | | | |

आपला विश्वासू,

अर्जदार

स्थळ : सातारा
दिनांक : / /२०२४

**'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**
**क्र.२१३,- मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४,ता.कराड, जि.सातारा**

प्रति,

**मा. सहाय्यक संस्था निबंधकसाहेब /**

**मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्तसाहेब,**

सातारा विभाग सातारा.

**विषय :-'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**
कराड- **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५१२४,**ता.कराड, जि.सातारा**
या संस्थेच्या कार्यालयासाठीच्या जागेबाबतचे संमत्तीपत्र.

महोदय,

मी खाली सही करणार **सचिव, शिवाजी एज्युकेशन सोसायटी कराड,** संमत्तीपत्रक लिहून देतो कि, **ग्रामपंचायत बनवडी, ता.कराड, जि.सातारा** येथील **ग्रा.मा.क्र.७४९** ही मिळकत संस्थेचे मालकीची असून त्यातील **यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड** या विद्यालयाचे इमारतीमधील एक खोली **'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''** कराड- **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५१२४,**ता.कराड, जि.सातारा** या संस्थेच्या कार्यालयासाठी मोफत वापर करणेसाठी दिली असून त्यासाठी कोणत्याही प्रकारची हरकत /तक्रार नाही, म्हणून लिहून दिले संमत्तीपत्र असे.

दिनांक :- / /२०२४

आपला विश्वासू

**सचिव**

**शिवाजी एज्युकेशन सोसायटी कराड**

प्रति, दि. / /२०२४

**मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त,**

सातारा विभाग सातारा

**<u>विषय :- जाहिर नोटीस वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दीस सुट मिळणेबाबत.</u>**

अर्जदार :- **श्री. सुदीप दिलीप करांडे, सचिव**

**'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**

**कराड, मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४,ता.कराड,**

**जि.सातारा**

महोदय,

मी, **'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ'' कराड, मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४.,ता.कराड, जि.सातारा** या संस्थेचा **सचिव** विनंती पूर्वक अर्ज करतो की,

**'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ'' कराड , मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४,ता.कराड, जि.सातारा** या संस्थेस कोणत्याही प्रकारची स्थावर मालमत्ता नसलेने सदर संस्थेस/मंडळास मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० चा नियम क्रमांक ७ अ प्रमाणे वर्तमानपत्रामध्ये द्यावी लागणारी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यास सुट मिळावी अशी विनंती आहे.

आपला विश्वासू,

सचिव

**'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**

**कराड, मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४,ता.कराड, जि.सातारा**

प्रति,

**मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्तसाहेब,**

सातारा विभाग,

सातारा

**विषय :-** **<u>पुरसीस</u>**

**अर्जदार :-** **श्री.सुदीप दिलीप करांडे, सचिव**
**'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**
**कराड, मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४,ता.कराड,**
**जि.सातारा**

**महोदय,**

मी पुरसीस लिहून देतो की, आपले कार्यालयात आम्ही वर नमूद केलेले मंडळ/ संस्था नोंदणी कामी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १८ अन्वये अर्ज दिला आहे.सदर अर्ज दाखल करते वेळी आम्ही सर्व कागदपत्रे पुरविली आहेत. त्या कागदपत्रांशिवाय आम्हांस आणखी जादा पुरावा सादर करणेचा नाही.

तरी सदरचे मंडळ/संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंद करणे विषयी विनंती आहे.

मेहरबानास जाहीर व्हावे. कळावे.

दिनांक :- / /२०२४

आपला विश्वासु,

**सचिव**

**'' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''**

**कराड, मसूर रोड, विद्यानगर, ४१५१२४,ता.कराड, जि.सातारा**

## परिशिष्ट ''फ''
# घोषणापत्र (प्रतिज्ञापत्र)

मी खाली सही करणार **श्री.सुदीप दिलीप करांडे, वय-३२ वर्षे, धंदा-नोकरी, रा.मु.पो.बनवडी, ता.कराड, जि.सातारा** सत्यप्रतिज्ञेवर सांगतो की,

मी , **श्री. सुदीप दिलीप करांडे, '' यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स कराड माजी विद्यार्थी संघ''** कराड-, **मसूर रोड, विद्यानगर,** ४१५ १२४, **ता.कराड, जि.सातारा या** संस्थेचा एक विश्वस्त **(सचिव)** असून संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये सदर संस्था नोंदणी करता माननीय सहाय्यक संस्था निबंधक, सातारा विभाग, सातारा यांचे कार्यालयात दिनांक – / /२०२४ रोजी प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर संस्थेच्या ज्ञापनातील , नियम व नियमावलीतील तसेच प्रस्तावाबाबत जोडलेले इतर कागदपत्रातील मजकूर व विधाने बरोबर व सत्य आहेत.

वरील संस्था ही आजी-माजी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व सामजीक स्वरुपाच्या उद्देशांकरीता स्थापन केलेली असून तिचे ध्येय व उद्देश संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम २० प्रमाणे आहेत.

मी असे सांगतो की,

१) या संस्थेचे संस्थापन समालेखावर (विधानपत्र) सह्या करणाऱ्या सर्व सभासदांना मी ओळखतो.

२) आज तारखेपर्यंत नोंदणी प्रकरणातील मजकूरात काहीही बदल झालेला नाही.

३) वरील नावांची किंवा नामसदृश्य संस्था/मंडळ माझ्या माहितीप्रमाणे आमचे गावी अस्तित्वात नाही वा नोंद झालेली नाही.

४) आज तारखेपर्यंत संस्थेस कोणत्याही प्रकारची स्थावर/जंगम मालमत्ता नाही. जंगम मालमत्ता म्हणून खालीलप्रमाणे आहे व ती त्यांचे ताब्यात आहे. संस्थेजवळ रोख रक्कम रुपये ११,२७५/- आहे व ती रक्कम अध्यक्ष/खजिनदार यांचेकडे जमा आहे.

५) या संस्थेच्या ज्ञापनात संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता किंवा संस्थेच्या पत्र व्यवहाराचा पत्ता या सदरात दिलेल्या पत्त्याची जागा **ग्रामपंचायत बनवडी, ता.कराड, जि.सातारा येथील ग्रा.पं.मा.क्र. ७४९ ही मिळकत शिवाजी एज्युकेशन सोसायटी चे** मालकीची असून त्याचे दस्त ऐवजाची खरी प्रत या घोषणापत्रासोबत सादर करीत आहे. याबाबतीत काही कमी जास्त झाल्यास अथवा काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी माझी स्वत:ची तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी यांचीही राहील. संस्थेच्या पत्त्यात काही बदल झाल्यास ती रितसर आपल्याकडे कळवण्याची माझी जबाबदारी राहील.

६) सर्व सभासदांचे ओळखपत्र व पत्त्याचा पुरावा या प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. तसेच सर्व सभासदांचे भ्रमणध्वनी व ईमेल क्रमांक नमुद केलेले आहेत. ती सर्व माहिती खरी व सत्य आहे.

७) संस्थेचे विहित नमुन्यात हिशोब नियमित सादर करणे, कार्यकारिणीमध्ये झालेला बदल मुदतीत विहित नमुन्यात कार्यालयास सादर करणे, संस्थेच्या नियमावलीमध्ये व विधानपत्रात संस्थेच्या हितार्थ केलेला बदल विहित मुदतीत, विहित नमुन्यात कार्यालयास सादर करणे याची जबाबदारी माझी व कार्यकारिणीची संयुक्त राहिल. तसेच नियम व नियमावलीतील तरतुदीप्रमाणे संस्थेचे कामकाज करण्यात येईल. यीच हमी मी कार्यकारिणीच्या वतीने देत आहे.

वरील मजकूर खोटे दिसून आल्यास भारतीय दंडविधान कायदा कलम १९०, १९९, २०० प्रमाणे दंडास व शिक्षेस मी पात्र राहीन.

स्थळ : सातारा

**घोषणापत्र करणाऱ्याची सही**

SKarande

**माझे समक्ष**

दिनांक : / /२०२४



**<u>प्रपत्र – अ</u>**

**<u>स्वयंघोषणापत्र</u>**

मी श्री.सुदीप दिलीप करांडे, दिलीप करांडे, यांचा मुलगा, वय –३२ वर्षे, आधार क्रमांक (असल्यास) ४३२७ ५७२८ ४३९१ व्यवसाय – नोकरी , राहणार– मु.पो.बनवडी, ता.कराड, जि.सातारा याद्वारे घोषित करतो की, सोबत स्वयंघोषणापत्रातील व वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण : सातारा

दिनांक : / /२०२४

**( श्री. सुदीप दिलीप करांडे )**



**<u>प्रपत्र – ब</u>**

**<u>स्वयं साक्षांकनासाठी स्वयंघोषणापत्र</u>**

मी श्री.सुदीप दिलीप करांडे, दिलीप करांडे, यांचा मुलगा, वय –३२ वर्षे, आधार क्रमांक (असल्यास) ४३२७ ५७२८ ४३९१ व्यवसाय – नोकरी , राहणार– मु.पो.बनवडी, ता.कराड, जि.सातारा याद्वारे घोषित करतो की, मी स्वयंसाक्षांकीत केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्यप्रती आहेत. त्या खोट्या असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण : सातारा

दिनांक : / /२०२४

**(सुदीप दिलीप करांडे)**